**पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२५-२६ मधील उर्वरीत राज्य हिस्सा अनुदानाकरीता रु.१२९,५१,३८,०४१/- इतकी रक्कम वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- फवियो-२०२६/प्र.क्र.९७/११-अे /ई.ऑ.क्र. १६४१४०१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२६

वाचा -

१. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.फवियो-२०२४/प्र.क्र.८१/१०-अे, दि.१२.०६.२०२४
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. एबख-२०२५/प्र.क्र.७२/२-अे, दि. ०६.०६.२०२५
३. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.फवियो-२०२५/प्र.क्र.२८०/११-अे, दि.०१.१०.२०२५
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०९.०४.२०२६
५. कृषि संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे पत्र जा.क्र.कृआ/ मुसां. /पुहआफपिवियो/अ.मा./२०२६/र-२२२, दि.०८.०६.२०२६

प्रस्तावना -

शेतकऱ्यांच्या फळ पिकांना हवामान धोक्यापासून विमा संरक्षण देऊन, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत व्हावी, याकरिता राज्यात प्राधान्याने प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. विविध हवामान धोक्यांमुळे, फळपीकांच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम होऊन, मोठ्या प्रमाणावर उत्पादनामध्ये घट येते. पर्यायाने शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने, आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते. या सर्व बाबींचा विचार करुन, प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना, राज्यात सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या २ वर्षांमध्ये, आंबिया बहारामध्ये संत्रा, मोसंबी, काजू, डाळिंब, आंबा, केळी व द्राक्ष (अ व ब), प्रायोगिक तत्वावर स्ट्रॉबेरी व पपई या ९ फळपीकांसाठी ३० जिल्ह्यांमध्ये महसूल मंडळ हा घटक धरुन भारतीय कृषि विमा कंपनी, बजाज जनरल इन्शुरन्स लि., जनरली सेंट्रल इन्शुरन्स कंपनी लि. व युनिव्हर्सल सॉम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी या विमा कंपन्यांमार्फत संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात आली.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत आंबिया बहार सन २०२५-२६ अंतर्गत उर्वरीत राज्य हिस्सा अनुदानाकरीता, कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र. (५) अन्वये विमा कंपन्यांना रक्कम रु.१२९,५१,३८,०४१/- (रुपये एकशे एकोणतीस कोटी, एकावन्न लाख, अडतीस हजार, एक्केचाळीस मात्र) इतका निधी वितरीत करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार पुनर्रचित हवामान आधारीत फळपीक विमा योजने अंतर्गत आंबिया बहार सन २०२५-२६ अंतर्गत उर्वरीत राज्य हिस्सा अनुदानापोटी रु.१२९,५१,३८,०४१/- इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत आंबिया बहार सन २०२५-२६ अंतर्गत उर्वरीत राज्य हिस्सा अनुदानाकरीता, कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र.(५) अन्वये केलेली शिफारस यांचा विचार करता, रक्कम रु.१२९,५१,३८,०४१/- (रुपये एकशे एकोणतीस कोटी, एकावन्न लाख, अडतीस हजार, एक्केचाळीस मात्र) इतका निधी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित विमा कंपन्यांना खालीलप्रमाणे अदा करण्यासाठी योजनेच्या ESCROW बँक खात्यामध्ये उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**आंबिया बहार सन २०२५-२६**

| अ. क्र. | विमा कंपनी | मागणी | पीएमएफबीवाय पोर्टल वरील दि. ०२.०६.२०२६ स्थित आकडेवारी नुसार मंजूर राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. | यापुर्वी एकूण वितरीत राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. | पीएमएफबीवाय पोर्टलनुसार प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. (४-५) | विमा कंपनीच्या मागणी पत्रकानुसार प्रलंबीत राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. | रकाना ६ व ७ पैकी विमा कंपनीस देय उर्वरीत राज्य हिस्सा अनुदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | भारतीय कृषि विमा कंपनी | १००१०२०२२७२५१३THGAUA | ३३२८२६७३८५ | १५२५६७६७२० | १८०२५९०६६५ | ८३९८४३९४८ | ८३९८४३९४८ |
| २ | युनिवर्सल सोम्पो | १००८०२०२२७२५७TIOW८VR | ४२९८२०५४१ | १९३४३७४२८ | २३६३८३११३ | २०७८४४००२ | २०७८४४००२ |
| ३ | बजाज जनरल | १००४०२०२२७२५QF९T२BTN | ५७०७७४३१२ | २७८९८०५३४ | २९१७९३७७८ | २४७४५००९१ | २४७४५००९१ |
| | **एकूण** | | **४३२८८६२२३८** | **१९९८०९४६८२** | **२३३०७६७५५६** | **१२९५१३८०४१** | **१२९५१३८०४१** |

२. सदरची रक्कम आंबिया बहार सन २०२५-२६ करीता वितरीत करण्यात येत असून त्याचा विनियोग इतर हंगामाकरीता अनुज्ञेय असणार नाही.

३. प्रस्तुत बाबीवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करीता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा-

**मागणी क्र. डी-३ ,**
**२४०१ - पीक संवर्धन**
**११०, पीक विमा,**
**(००) (०७) हवामान आधारित फळपीक विमा योजना राज्य हिस्सा**
**(२४०१ ९४०२) ३३-अर्थसहाय्य**

४. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रक नुसार खर्च करण्यात यावा.

६. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२३४/२०२६/व्यय-१,दि.०२.०६.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०८०३१३४५४७८६४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.08.03 13:46:38 +05'30'

**(प्रतिभा पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सचिव (कृषि), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) संचालक, लेखा व कोषगारे, मुंबई
८) सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११) नियोजन विभाग (१४३१), मंत्रालय, मुंबई
१२) वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई
१३) विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी लि., लोक चेंबर्स, मरोल मरोशी नाका, मरोल. अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९.
१४) विभागीय व्यवस्थापक, युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि., पहिला मजला MAIDC, आकृती स्टार, सेन्ट्रल रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३
१५) विभागीय व्यवस्थापक, बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड, क्षेत्रीय कार्यालय ४ था मजला, टॉवर नं.०७, कॉमर झोन IT पार्क, सम्राट अशोक पथ, येरवडा जेल रोड, पुणे- ४११ ००६
१६) निवडनस्ती (११-अे)